## काय करावे

- जेवताना पाणी प्यावे. जेवणानंतर किमान १ तास पाणी पिऊ नये. ( भोजने अमृतं वारि भोजनान्ते विषप्रदम् ।)
- रात्रीचे जेवण ८ वाजायच्या दरम्यान घ्यावे. जेवणात शेवटी दुधपोळी, दुधभाकरी, किंवा दुधभात घ्यावा.
- जेवणात अत्यंत पातळ ताक घ्यावे.
- जेवणात कोबी, फुलकोबी, घोसाळे, दोडका, भोपळा, तांबडा भोपळा, पडवळ, शेवगा, सुरण, भेंडी, तोंडली घ्यावी.
- मुगाच्या डाळीचे वरण उत्तम.
- गाईचे दुध, तुप, आमसूल, अंजीर यांचा वापर वाढवावा.
- फळे खावीत, केळांचा उत्तम उपयोग होतो.
- रात्री झोपताना २ चमचे तूप गरम दुधात टाकून घ्यावे.
- काळ्या मनुकांचा (किसमिस) उत्तम उपयोग होतो.

## काय करू नये

- बाहेरचे सर्व पदार्थ, तळलेले, आंबवलेले पदार्थ संपूर्ण वर्ज्य करावेत.
- हिरवी मिरची, काळा मसाला वर्ज्य करावे.
- तुरीची डाळ, लोणचे, पापड काही दिवस वर्ज्य करावे.
- मांसाहार संपूर्ण वर्ज्य करावा.
- मद्यपान संपूर्ण वर्ज्य करावे.
- वाल, गवार, वांगे, बटाटे टाळावेत.
- रक्तस्राव असेल तर पपई व चिकू टाळावे.
- मेथी, पालक, अळुची पाने ही पित्तकर द्रव्ये आहेत, ती घेऊ नयेत.
- मोड आलेली कडधान्ये शक्यतोवर टाळावीत.
- बेकरीचे पदार्थ टाळावे. चहा व कॉफी थोडी आणि २ वेळेच घ्यावी.
- उपवास करु नये, शेंगदाणे, साबुदाणा विशेष करून टाळावेत.

Mfg. & Mkd. by:

GMP Certified Company

**Global Herbs Marketing**

**Regd. Off.:** C-9, Tulsinagar, Near Canara Bank, Bibvewadi, Pune - 411 037, India.

**Factory:** 30/1, Jambulwadi Rd., Ambegaon (Kh), Pune - 411 046, India.

- Telefax : 020- 24410355
- Website : www.globalherbs.in
- E-mail : globalherbspune@gmail.com

Page 4

# मुळव्याध!

## जे दुखणे न सांगता येत.. न दाखविता येत...

1. आपणास शौचाला वेदना होतात का?
2. आपणास जुनाट पोट साफ न होण्याचा त्रास आहे का?
3. आपणास शौच्याला जळजळ होते का?
4. शौचाला जागी मांस वृध्दी जाणवते का?
5. आपणास शौचाला कडक होऊन त्रास होतो का?
6. आपणास पू व रक्त मिश्रित शौचाला होते का?

**आपणास Piles/Fissure/Fistula**
**या पैकी कुठला तरी त्रास असू शकतो....**

कृपया आपल्या डॉक्टरांना विचारा!

From the Makers of,
**Piloglob®**
Tablets & Ointment

Page 1

## मुळव्याध (Piles) म्हणजे काय?

गुदद्वाराच्या जागी असलेल्या रक्तवाहिन्या फुगणे, त्यात रक्त साकळणे म्हणजे मुळव्याध (Piles).

## मुळव्याध (Piles) का होते?



पाइल्स हा आजार फक्त माणसातच बघायला मिळतो. आपल्या उभे राहण्याचा तो परिणाम आहे. गदद्वार आणि आजुबाजूच्या भागात असणाऱ्या रक्तवाहिन्या या उभ्या असतात आणि त्यात Valves नसतात. सामान्य माणसात पक्काशयाचा शेवटचा अर्धा भाग रिकामा असतो. पण ज्या लोकांमध्ये जुनाट मलबध्दतेचा त्रास असतो त्यांच्यात त्या खालच्या भागातही मळ साठत जातो. पक्काशयात साठलेला मळ त्याच्या भिंतीवर दाब निर्माण करतो त्यामुळे रक्तवाहिन्या दाबल्या जातात व त्यांचा शेवटचा भाग फुगतो, त्यालाच आपण मुळव्याध (Piles) म्हणतो.

## मुळव्याधची (Piles) लक्षणे कोणती?

वर लिहिल्याप्रमाणे मुळव्याध (Piles) म्हणजे गुदद्वार-पक्काशय या भागतल्या फुगलेल्या रक्तवाहिन्या. शौचाला होताना या फुगलेल्या रक्तवाहिन्या फुटतात व रक्तस्राव होतो. हा रक्तस्राव थेंबाच्या स्वरुपात तर कधीकधी धारेच्या स्वरुपात होतो. या फुगलेल्या रक्तवाहिन्यांना सूज (Inflammation) येते. त्यात जंतुसंसर्ग (Infection) होते. असे होत असेल तर शौचाच्या वेळी वेदना होतात, आग होते, बसताना त्रास होतो. कधीकधी रक्तस्राव हे एकच लक्षण असते (Uninfected). तर कधीकधी फक्त वेदना जळजळ व गुदद्वाराच्या स्थानी गाठीसारखा भाग असतो. रक्तस्राव नसतो.

## Fissure म्हणजे काय?




गुदद्वाराच्या ठिकाणी होणारी जखम म्हणजे Fissure.

Page 2

## Fissure कसे होते?

जेव्हा कडक आणि घट्ट शौचाला होते तेव्हा गुदनलिका ताणली जाऊन त्यात चिर पडते. त्यालाच Fissure म्हणतात. आपल्याकडे सामान्यपणे मुळव्याध आहे म्हणणारे बहुतांशी रुग्ण हे Fissure चेच असतात. गुदनलिकेत झालेल्या जखमेत जंतूसंसर्ग (Infection) होतो व त्यात सूज (Inflammation) येते.

## Fissure ची लक्षणे

Fissure हा सर्वात जास्त वेदना व जळजळ असणारा प्रकार आहे. यात होणारा रक्तस्राव हा अगदी कमी व शौचाला चिकटून होतो.

## भगंदर (Fistula) म्हणजे काय?

Fissure झाल्यानंतर व्यवस्थित उपचार घेतले नाही तर Fissure च्या जखमेतून जंतूसंसर्ग होतो. तो संसर्ग वाढत जातो व गुदद्वाराच्या शेजारच्या जागेतून गळू होऊन त्यातून पुन्हा पुन्हा पू (Pus) येत राहतो. थोडक्यात भगंदर (Fistula) हा एक गळूचाच प्रकार आहे.




## भगंदर (Fistula) ची लक्षणे

या रूग्णाला बहुतेक वेळेला जुनाट Fissure असते, त्यामुळे शौचाला त्रास, वेदना, जळजळ असते. त्याचबरोबर गुदद्वाराशेजारी गळूचे तोंड (Opening) असते, त्यातून पू येत राहतो. पू येत असेल तर बरे वाटते. पू येण्याचे बंद झाले तर जागा ठसठसते. भगंदर (Fistula) हा दोन प्रकारचा असतो. गुदनलिका व पक्काशय यात जर आतील Opening असेल तर त्याला Low level fistula म्हणतात व जर Opening पक्काशयात असेल तर त्याला High level fistula म्हणतात.

Page 3

**Piloglob Info. LBL**
center fold LBL,
front/Back total 4 pages
Open size : 22.5 x 20 cm
Closed (Page) size: 22.5 x 10 cm
Printing: 4+4 ptg.
Client: Global Herbs (Dr. Joshi Sir)
Date: 15 AUG. 2013
Date: 19 AUG. 2013 Final